सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

जिल्हा व सत्र न्यायालय, बुलढाणा

# नागरिकांची सनद

सन २०२४

दिनांक :- ०१ जुलै, २०२४.

## प्रमुख जिल्हा व सत्र न्यायालय, बुलढाणा

हे कार्यालय विधी व न्याय विभागांतर्गत येते. या कार्यालयाचे प्रारुप खालीलप्रमाणे आहे.



वरील सर्व न्यायालये हे दिवाणी प्रक्रिया संहिता, फौजदारी प्रक्रिया संहिता व इतर कायदे तसेच मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी ठरवून दिलेल्या दिवाणी नियमावली व फौजदारी नियमावलीनुसार त्यांच्या न्यायालयास असलेल्या महसुली अधिकार क्षेत्रानुसार न्यायदानाचे काम करतात.

<u>दिवाणी व फौजदारी न्यायालयात खालीलप्रमाणे प्रकरणे दाखल होतात.</u>

प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, बुलढाणा यांना जिल्हा न्यायालया अंतर्गत तालुका जिल्हा स्तरावर कार्यरत न्यायालयाचे कामकाजावर देखरेख करण्याबाबत प्रशासकीय अधिकार आहेत.

<u>प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, जिल्हा न्यायाधीश तथा अतिरिक्त सत्र न्यायाधीश व तदर्थ जिल्हा न्यायाधीश तथा अतिरिक्त सत्र न्यायाधीश यांच्या न्यायालयात खालील प्रमाणे प्रकरणे दाखल होतात.</u>

<u>दिवाणी स्वरुपाची प्रकरणे-</u> मुल्य मर्यादेनुसार अधिकार असलेल्या प्रकरणा मधील दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर यांच्या निकाल व हुकूमनाम्याचे विरुध्दची अपीलांची प्रकरणे ही दाखल होतात व ते नियमानुसार निकाली काढण्यात येतात. तसेच मोटार अपघात नुकसान भरपाई अंतर्गत येणारी प्रकरणे, लवाद व समेट अधिनियम अंतर्गत येणारी प्रकरणे, विशेष विवाह कायदयांतर्गत येणारी प्रकरणे, गार्डीयन ॲन्ड वार्ड कायदा अंतर्गत येणारी प्रकरणे तसेच बॉम्बे पब्लिक ट्रस्ट कलम ७२ अंतर्गत येणारी प्रकरणे ही दाखल होतात व ते नियमानुसार निकाली काढण्यात येतात.

प्रशासकीय कारणांवरुन जिल्हयातील कोणत्याही न्यायालयातुन दिवाणी स्वरुपाची प्रकरणे आवश्यक त्या न्यायालयात वर्ग करण्याचे अधिकार तसेच दत्तक विधान संबंधी प्रकरणे चालविण्याचे अधिकार प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश यांना आहेत.

जिल्हा न्यायाधीश यांना रुपये १ कोटी मूल्य मर्यादेपर्यंत अपील निकाली काढण्याचे अधिकार आहेत.

<u>फौजदारी स्वरुपाची प्रकरणे-</u> जसे न्यायदंडाधिका-याने गुन्हयाची दखल घेवुन ती प्रकरणे सत्र न्यायालयाकडे वर्ग केल्यानंतर सदर सत्र खटले नियमानुसार पुरावा नोंदविल्यानंतर निकाली काढण्यात येतात. न्यायदंडाधिका-यांनी फौजदारी प्रकरणात दिलेल्या शिक्षेबाबत किंवा ईतर न्यायनिर्णयाविरुध्द आवाहन केलेले अपील आणि पुनर्विलोकनाची प्रकरणे ही दाखल होतात व ती नियमाप्रमाणे निकाली काढण्यात येतात.

भष्ट्राचार प्रतिबंधक अधिनियमांतर्गत येणारी प्रकरणे, विद्युत अधिनियम, २००३ अंतर्गत येणारी प्रकरणे, अनुसूचित जाती जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्या अंतर्गत येणारी प्रकरणे, ही दाखल होतात व या सर्व प्रकरणात पुरावा नोंदवुन ती नियमानुसार निकाली काढण्यात येतात.

प्रशासकीय कारणांवरुन जिल्हयातील कोणत्याही न्यायालयातुन फौजदारी स्वरुपाची प्रकरणे आवश्यक त्या न्यायालयात वर्ग करण्याचे अधिकार प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश यांना आहेत.

<u>जिल्हा न्यायाधीश-१ तथा अतिरिक्त सत्र न्यायाधीश हे विशेष न्यायालय आहे, यांच्या न्यायालयात खालीलप्रमाणे प्रकरणे दाखल होतात.</u>

<u>फौजदारी स्वरुपाची प्रकरणे-</u> लैंगिक अत्याचारापासून बालकांचे संरक्षण अधिनियमांतर्गत येणारी प्रकरणे, एन.डी.पी.एस. अधिनियमाखाली येणारी प्रकरणे, महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी कायदयांतर्गत येणारी प्रकरणे दाखल होतात व या सर्व प्रकरणात पुरावा नोंदवून ती नियमानुसार निकाली काढण्यात येतात.

<u>दिवाणी स्वरुपाची प्रकरणे-</u> कमर्शियल कायदयांतर्गत येणारी प्रकरणे दाखल होतात व ते नियमानुसार निकाली काढण्यात येतात.

<u>मुख्य न्यायदंडाधिकारी यांच्या न्यायालयात खालीलप्रमाणे प्रकरणे दाखल होतात.</u>

<u>फौजदारी स्वरुपाची प्रकरणे-</u> फौजदारी प्रक्रिया संहिता अंतर्गत येणारी प्रकरणे, औषध व सौंदर्य प्रसाधने कायदा अंतर्गत येणारी प्रकरणे, अन्न व भेसळ कायदा अंतर्गत येणारी प्रकरणे, सरकारी कर्मचारी यांनी केलेल्या आर्थीक अफरातफरीची प्रकरणे, हि दाखल होतात व या सर्व प्रकरणात पुरावा नोंदवुन ती नियमानुसार निकाली काढण्यात येतात.

<u>दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर आणि सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर यांच्या न्यायालयात खालीलप्रमाणे प्रकरणे दाखल होतात.</u>

<u>दिवाणी स्वरुपाची प्रकरणे-</u> दिवाणी प्रक्रिया संहितेनुसार आर्थीक मुल्य रुपये ५,००,०००/- च्या वरचे सर्व दिवाणी प्रकरणे, शासनाच्या विरोधात असलेली दिवाणी प्रकरणे, हिंदु विवाह कायद्यांतर्गत येणारी प्रकरणे, भुसंपादन कायद्यातर्गत येणारी प्रकरणे, भारतीय उत्तराधिकार अधिनियम १९२५ अन्वये सदर न्यायालयाच्या अधिकारक्षेत्रात येणारे वारसपत्र, प्रशासन पत्र मिळण्याकरीता यात हरकत घेण्यात आलेली आहे अशी प्रकरणे, ही दाखल होतात व या सर्व प्रकरणात पुरावा नोंदवुन ती नियमानुसार निकाली काढण्यात येतात.

<u>दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग यांच्या न्यायालयात खालीलप्रमाणे प्रकरणे दाखल होतात.</u>

<u>दिवाणी स्वरुपाची प्रकरणे-</u> जसे दिवाणी प्रक्रीया संहिते नुसार आर्थीक मुल्य रुपये ५,००,०००/- च्या आतील दिवाणी प्रकरणे, भारतीय उत्तराधिकार अधिनियम १९२५ आणि बॉम्बे विनियम VII सन १८२७ अन्वये सदर न्यायालयाच्या अधिकारक्षेत्रात येणारी वारसपत्र मिळण्याचे अर्ज ज्यात हरकत घेण्यात आलेली नाही अशी प्रकरणे दाखल होतात व नियमाप्रमाणे निकाली काढण्यात येतात.

<u>फौजदारी स्वरुपाची प्रकरणे-</u> फौजदारी प्रक्रीया संहिते अंतर्गत येणारी प्रकरणे, जिवनावश्यक वस्तू कायदा अंतर्गत येणारी प्रकरणे, परक्राम्य संलेख अधिनियम कलम १३८ अंतर्गत येणारी प्रकरणे, कौटुंबिक हिंसाचार प्रतिबंधक कायदा अंतर्गत येणारी प्रकरणे, वन्यजीव प्राणी कायदा अंतर्गत येणारी प्रकरणे, जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम अंतर्गत येणारी प्रकरणे, गर्भलिंग निदान प्रतिबंध कायदा अंतर्गत येणारी प्रकरणे, मुंबई दारुबंदी कायदा अंतर्गत येणारी प्रकरणे, मुंबई जुगार कायदा अंतर्गत येणारी प्रकरणे, मुंबई पोलीस कायदा अंतर्गत येणारी प्रकरणे, मोटार वाहन कायदा अंतर्गत येणारी प्रकरणे, मुंबई ग्रामपंचायत कायदा अंतर्गत येणारी प्रकरणे, नगरपालीका अधिनियम या अंतर्गत येणारी प्रकरणे, वजन व मापे कायदा अंतर्गत येणारी प्रकरणे व न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग यांना चालविण्याचे अधिकार असलेले फौजदारी स्वरुपाचे प्रकरणे या न्यायालयात दाखल होतात व या सर्व प्रकरणात पुरावा नोंदवुन ती नियमानुसार निकाली काढण्यात येतात.

<u>मुख्य न्यायदंडाधिकारी यांचे न्यायालये सोडून इतर सर्व न्यायालयांना दिवाणी स्वरुपाची प्रकरणे चालविण्याचा अधिकार आहे.</u>

# प्रमुख जिल्हा व सत्र न्यायालय, बुलढाणा

## नागरीकांची सनद

### विवरणपत्र-१

या कार्यालयाकडून पक्षकारांना खालीलप्रमाणे सुविधा/सेवा दिल्या जातात.

| अ.क्र. | कार्यालयाचे नांव | जनतेस देण्यात येणा-या सेवा (स्तर नमुद करावा) | त्यासाठी कोण-कोणत्या कागदपत्रांची आवश्यकता आहे | सेवा देणारे अधिकारी (सेवानिहाय प्राधिकाराचे नांव नमुद करावे) | सेवा पुरविण्यास लागणारा कालावधी (निर्धारित असल्यास विहीत/सर्वसाधारण) | अपील असल्यास अपिलीय प्राधिकारी आणि अपील करण्याचा विहित कालावधी | सेवा पुरविल्या न गेल्यास तक्रार (असल्यास) ती कोणाकडे करावयाची (पदनाम व पत्ता) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | प्रमुख जिल्हा व सत्र न्यायालय, बुलढाणा | १. जनतेकडून माहितीचा अधिकार अधिनियमांतर्गत आलेल्या अर्जांना उत्तरे | महाराष्ट्र जिल्हा न्यायालय माहितीचा अधिकार (सुधारित नियम) २००९ यात दिल्याप्रमाणे नियम ४ नुसार ज्या व्यक्तीस माहिती अधिकारांतर्गत माहिती पाहिजे त्यांनी जोडपत्र-अ या विहित नमुन्यात अर्ज करावा व त्याखाली स्वत: स्वाक्षरी करावी आणि अर्जास रु.१०/- चा न्यायालय फी मुद्रांक चिकटवावा. अर्जदार हा जर दारिद्रय रेषेखालील असल्यास त्यास न्यायालय फी मुद्रांक देण्याची आवश्यकता नाही. परंतु त्याला अर्जासोबत तो दारिद्रय रेषेखालील असल्याबाबतचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे. अर्जदारास माहिती पोष्टाद्वारे पाहिजे असल्यास त्याने अर्जासोबत रजिस्टर पोष्टाचे पाकिट ज्यावर त्याचे नांव व पत्ता लिहून जोडणे आवश्यक आहे. | श्री. एस.जी.जाधव, प्रभारी प्रबंधक तथा जन माहिती अधिकारी, जिल्हा न्यायालय, बुलढाणा. | माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून ३० दिवस.<br>सहा. अधिका-याकडे परस्पर अर्ज प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून ३५ दिवस. | --- | प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, बुलढाणा. |
| | | २. जनतेकडून माहितीचा अधिकार अधिनियमांतर्गत आलेल्या अपिलांना उत्तरे | माहिती अधिकारांतर्गत विहित केलेल्या जोडपत्र-ब या विहित नमुन्यामध्ये अर्ज करावा. अर्जाला रु.२०/- चा न्यायालय फी मुद्रांक चिकटवावा. अर्जदार दारिद्रय रेषेखालील असल्यास त्यास न्यायालय फी मुद्रांक देण्याची आवश्यकता नाही. परंतु त्याला अर्जासोबत तो दारिद्रय रेषेखालील असल्याबाबतचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे. | श्री. आर.एन.मेहरे, जिल्हा न्यायाधीश-१ तथा अपिलीय अधिकारी, बुलढाणा. | अपिलीय प्राधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून ३० दिवस | अपिलीय अधिका-याकडे अपील अर्ज प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून ३० दिवस. उत्तर मिळाल्यापासून ९० दिवसात राज्य माहिती आयुक्त, अमरावती यांचेकडे. | --- |
| २ | प्रमुख जिल्हा व सत्र न्यायालय, बुलढाणा व ईतर न्यायालये | पक्षकाराकडून प्राप्त नकलेच्या अर्जाप्रमाणे न्यायिक प्रकरणातील दाखल दस्त, साक्षी-पुरावे, न्यायनिर्णय यांच्या नकला पुरविणे | नक्कल विभागात विहित नमुन्यात प्रमाणित नकला मिळण्याकरीता अर्ज करावा लागतो व त्यास रु.५/- चे न्यायालय फी मुद्रांक चिकटवावे लागते. | सहायक अधिक्षक, नक्कल विभाग, जिल्हा न्यायालय, बुलढाणा | दिवाणी नियमावली व फौजदारी नियमावली यातील तरतुदीनुसार नक्कल विभागास अभिलेख प्राप्त झाल्यापासून सर्वसाधारण नक्कल १० दिवस. तात्काळ नक्कल ४८ तास. | --- | संबंधित कार्यालय प्रमुखाकडे |

# प्रमुख जिल्हा व सत्र न्यायालय, बुलढाणा

## नागरीकांची सनद

### विवरणपत्र-१

| अ.क्र. | कार्यालयाचे नांव | जनतेस देण्यात येणा-या सेवा (स्तर नमुद करावा) | त्यासाठी कोण-कोणत्या कागदपत्रांची आवश्यकता आहे | सेवा देणारे अधिकारी (सेवानिहाय प्राधिकाराचे नांव नमुद करावे) | सेवा पुरविण्यास लागणारा कालावधी (निर्धारित असल्यास विहीत/सर्वसाधारण) | अपील असल्यास अपिलीय प्राधिकारी आणि अपील करण्याचा विहित कालावधी | सेवा पुरविल्या न गेल्यास तक्रार (असल्यास) ती कोणाकडे करावयाची (पदनाम व पत्ता) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ३ | प्रमुख जिल्हा व सत्र न्यायालय, बुलढाणा व जिल्हयातील ईतर सर्व न्यायालये | वकिल व पक्षकार यांना त्यांच्या प्रकरणांतील विविध टप्प्यांवर एसएमएस संदेश...<br><br>वकिल व पक्षकार यांना ई-मेलद्वारे आदेश/न्यायनिवाडे पाठविणे...<br><br>ई-कोर्टस सर्विसेवर प्रकरणांची ऑनलाईन माहिती उपलब्ध<br><br>वकिल व पक्षकार यांना त्यांच्या प्रकरणांची ई-सुविधा केंद्रामध्ये माहिती दिली जाते.<br><br>ई-सेवा केंद्र (जिल्हा मुख्यालय)<br>१. याद्वारे वकिल व पक्षकार यांना न्यायालयीन कामकाजासंबंधी आवश्यक सर्व प्रकारच्या सुविधा व माहिती एकाच ठिकाणी दिल्या जाते.<br><br>२. ई-सेवा केंद्रात न्यायालयीन परिसरात असलेल्या सर्व आस्थापना आणि सुविधांची माहिती वकिल व पक्षकारांना पुरविण्यात येते.<br><br>३. या केंद्राचे काम कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी सकाळी ९.३० ते सायं.६.३० या वेळेत सुरु असते.<br><br>४. खटल्याची सद्यस्थिती खटला सुरु असलेल्या न्यायालयाचे नांव, जागा तसेच त्या न्यायालयातील त्या दिवशी ठेवण्यात आलेल्या सर्व खटल्यांची यादी इत्यादी माहिती मिळते. | एसएमएस व ई-मेलद्वारे माहिती मिळण्यास्तव वकिल तथा पक्षकार यांना त्यांचा ई-मेल आयडी तथा मोबाईल क्रमांक सीआयएस प्रणालीमध्ये प्रविष्ट करणे आवश्यक आहे.<br><br>-- | --- | प्रकरणांत होणारे आदेश/न्यायनिवाडे दुस-यादिवशी ई-मेलद्वारे प्राप्त होतात.<br><br>एसएमएस प्रकरणाचे कामकाज आटोपल्यानंतर त्याचदिवशी दुपारी किंवा सायंकाळी सीआयएस प्रणालीमध्ये समाविष्ट असलेल्या वकिल तथा पक्षकार यांचे मोबाईलवर पाठविले जातात. | --- | प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, बुलढाणा. |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | ५. दावे अथवा खटले ई-फायलिंग द्वारे दाखल करण्याची सुविधा तसेच ई-पेमेंट करण्यास्तव मदत/मार्गदर्शन या ठिकाणी केली जाणार असून ई-फायलिंग करण्याकरीता आवश्यक ते मार्गदर्शन करणे तसेच कागदपत्रे अपलोड करणे तसेच ई-व्हेरिफिकेशन याकरीता मार्गदर्शन केले जाणार आहे.<br><br>६. आधार ई-साईन करण्याकरीता मदत केली जाणार आहे.<br><br>७. ई-कोर्टस् मोबाईल ॲप भ्रमणध्वनीवर स्थापित करण्याकरीता सुध्दा मदत केली जाते.<br><br>८. मोफत विधी सेवा व सहाय्य मिळविण्याकरीता मार्गदर्शन केले जाणार आहे.<br><br>९. ट्राफिक चालानच्या आभासी न्यायालयात दाखल असलेल्या खटल्यांमध्ये तडजोड करण्यासाठी आणि दंड भरण्यासाठी पक्षकारांना मदत/मार्गदर्शन केले जाणार आहे. | | | | | |

Digitally signed by SWAPNIL CHANDRAKANT KHATI
Date: 2024.07.03 14:52:58 +0530

प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश,
बुलढाणा.

# जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, बुलढाणा

## नागरीकांची सनद

### विवरणपत्र-२

| अ.क्र. | कार्यालयाचे नांव | जनतेस देण्यात येणा-या सेवा (स्तर नमुद करावा) | त्यासाठी कोण-कोणत्या कागदपत्रांची आवश्यकता आहे | सेवा देणारे अधिकारी (सेवानिहाय प्राधिकाराचे नांव नमुद करावे) | सेवा पुरविण्यास लागणारा कालावधी (निर्धारित असल्यास विहीत/सर्वसाधारण) | अपील असल्यास अपिलीय प्राधिकारी आणि अपील करण्याचा विहित कालावधी | सेवा पुरविल्या न गेल्यास तक्रार (असल्यास) ती कोणाकडे करावयाची (पदनाम व पत्ता) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, बुलढाणा | १. मोफत विधीज्ञ तसेच जनतेला कायद्याच्या संदर्भात मोफत माहिती दिली जाते.<br>२. न्यायालयीन प्रकरणांबाबत मोफत विधी सहाय्य दिले जाते.<br>३. सरकारी खर्चाने वकिलांची नेमणूक<br>४. महिला अनु.जाती व जमातीचे सदस्य यांना मोफत विधी सहाय्य<br>५. कारागृहातील बंदी/कैद्यांना मोफत सहाय्य व सल्ला देण्याकरीता विधी सहाय्य समुपदेशकांची नियुक्ती | तलाठी किंवा तहसिलदार यांचा रु.३०००००/- च्या आत उत्पन्न असल्याचा दाखला | सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, बुलढाणा | त्वरित | --- | प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, बुलढाणा. |
| २ | | मनोधैर्य योजनेंतर्गत पिडीतांना आर्थिक मदत | १. एफआयआरची प्रत<br>२. १६४ चे बयान<br>३. वैद्यकीय प्रमाणपत्र | सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, बुलढाणा | --- | --- | |
| ३ | | गावोगावी जावून शिबीराचे माध्यमातून कायद्याची माहिती देणे | --- | --- | --- | --- | |
| ४ | | विवादाचा समेटाने समझोता करण्यासाठी सर्व जिल्हयामध्ये लोकअदालत व मध्यस्थी केंद्राची उपलब्धता | --- | --- | --- | --- | |

सचिव,
जिल्हा विधी सेवा प्राधिकरण,
बुलढाणा.